माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००८५७**

**अपिलार्थी श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (कुर्ला विभाग)**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
कक्ष क्र.४०७, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
कक्ष क्र.४०७, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०२.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०७.२०२४ | ०५.०७.२०२४ | २८.०८.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(१) "दि. २३.०६.१९९३ रोजी दिलेल्या अर्जा संबंधित संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईच्या तपशील देण्यात यावा.*

*(२) प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था मधील खोली क्र. १९३० या रुमचे चलन फॉर्मची छायांकित प्रत देण्यात यावी.*

*(३) घाटकोपर पश्चिम मधील साईनाथ नगर रोड व जगदूशा नगर रोड यांच्यामध्ये असलेल्या विभाग इंदिरानगर नं. १ मधील किती घर मालकांनी चलन फॉर्म भरले आहेत त्याची नावांची यादी आणि चलन फॉर्म नंबर देण्यात यावे."*

..२/-

३. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०५.०७.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आपला माहिती मिळणेबाबतचा दि. ०३.०७.२०२४ रोजीचा ऑनलाईन प्रणालीवर प्राप्त झालेला अर्ज (अर्ज क्र. HOSDP/R/२०२४/६०५२२) व ई-मेलद्वारे प्राप्त झालेला अर्ज या कार्यासनास दि. ०५.०७.२०२४ रोजी प्राप्त झाला आहे. आपल्या माहिती अर्जातील विषय महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई या कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६ (३) अन्वये जन माहिती अधिकारी, उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि.०२.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्ज क्र. HOSDP/A/२०२४/६०१२६ दि. २८.०८.२०२४ ला अनुसरुन कळविण्यात येते की, त्यांनी ज्या माहिती अधिकाराखालील मूळ ऑनलाईन अर्ज क्र.HOSDP/R/२०२४/६०५२२ दि. ०३.०७.२०२४ संदर्भात उपरोक्त प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे, तो मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कार्यासन-झोपनि-२ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) नुसार त्यांचे पत्र क्र. माअअ-२०२४/प्र.क्र.११५/झोपनि-२, दि. ०५.०७.२०२४ अन्वये जन माहिती अधिकारी, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरित केलेला आहे. त्यामुळे श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांच्याकडून ऑनलाईन प्रणालीवर प्राप्त झालेला प्रथम अपील अर्ज क्र. HOSDP/A/२०२४/६०१२६ पुढील उचित कार्यवाहीसाठी या सोबत आपल्याकडे पाठविण्यात येत आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्याकडे सदर विषयी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत व त्यांनी सदर प्रकरणाची वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली.

६. आयोगाच्या अभिलेखावरील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाच्य वस्तुस्थितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २६.०५.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

8-5-2026

**मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००८५७**
**अपिलार्थी श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर**
**सुनावणी दिनांक : २६.०५.२०२६ (In continuation of order dt ०८.०५.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या अभिलेखावरील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाच्या वस्तुस्थितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

३. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ यांनी त्यांचे पत्र दि. २०.०५.२०२६ आयोगास सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, मुंबई तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पूर्व), मुंबई मंडळ, मुंबई या कार्यालयाशी संबंधीत असल्याने त्यांनी संबंधीत कार्यालयास आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविलेले आहे.

४. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, मुंबई तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पूर्व), मुंबई मंडळ, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

५. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, मुंबई तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पूर्व), मुंबई मंडळ, मुंबई यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.०६.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**

26-5-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत:- (१) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, मुंबई.
(२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पूर्व), मुंबई मंडळ, मुंबई.